2017-18

ISSN 2394-5303

GOLDEN JUBILEE YEAR
1967-2017

सुवर्ण महोत्सवी वर्ष

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

# Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.), PIN- 443204.

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

Special Issue, December 2017

# Printing Area™

International Multilingual Research Journal

IMPACT FACTOR 4.002



# Changing Trends & Issues in Indian Politics

(Volume : I)

Chief Editor:
Dr. Anant Madan Awati



Scanned with CamScanner

54)नक्षलवाद आणि हिंसा
प्रा.डॉ. विकास कृष्णराव जुनगरी, जि.यवतमाळ. || 174

55)भारतामध्ये दहशतवादाचा पडलेला प्रभाव
प्रा.डॉ. कल्पना माणिकराव कदम, नांदेड. || 177

56)दहशतवाद : भारतासमोरील आव्हान
डॉ.दिनकर संतुकराव कळंबे, जि.जालना || 180

57)पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद भारताला आव्हान
प्रा.डॉ.गणेश डी. गिरी & डॉ.किशोर सुर्यवंशी, औरंगाबाद || 182

58)दहशतवाद : भारतासमोरील एक आव्हान
प्रा.डॉ. के. जी. पोकळे & प्रा.डॉ. संजय वामनराव भोळे, जि. जळगाव. || 185

59)ईशान्य भारतातील समस्या भारताच्या अंतर्गत सुरक्षेपुढील आव्हान
प्रा.डॉ. एन. झेड. पाटील,ता.जि.धुळे, || 188

60)दहशतवाद : भारतासमोरील आव्हान
प्रा.वसावे अशोक रामसिंग, नाशिक, || 191

61)दहशतवाद — एक समस्या
डॉ. सुनिल पिंपळे, औरंगाबाद || 193

62)जम्मू–काश्मीरमधील दहशतवाद आणि मानवी हक्कांचे उल्लंघन
प्रा.डॉ. रामकिशन बसंतराव लोमटे, जि. औरंगाबाद. || 195

63)भारतातील सामाजिक सुधारणा चळवळीतील समाजसुधारकांचे योगदान
प्रा. डॉ. आर.एन.शेवाळे, जि. जळगांव. || 198

64)दहशतवाद : भारतासमोरील आव्हान
प्रा.डॉ.उमाकांत राठोड, पैठण. || 202

65)दहशतवाद: भारतासमोरील एक आव्हान
डॉ.आर.डी.इंगोले, जि.बुलडाणा || 204

66)दहशतवाद : भारतासमोरील अव्हान
डॉ.सिध्देश्वर सटाले, गेवराई. || 207

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned with CamScanner

66

# दहशतवाद : भारतासमोरील अव्हान

डॉ.सिध्देश्वर सटाले,
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
गेवराई.

**प्रस्तावना :**

दहशतवाद संकल्पना ही आजच्या काळात नविन राहिलेली नाही. ती देशाच्या कानाकोपऱ्यात जावून पोहचली आहे. समाजाच्या अनेक संस्थांच्या माध्यमातुनच दहशतवाद अस्तित्वात आलेला आहे. फरक एवढाच आहे की, त्याची व्याप्ती स्वरुप बदलत आहे. एकविसाव्या शतकात दहशतवादाची व्याप्ती जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचून अवाढव्य झालेला आहे. सद्या दोनशेहून अधिक दहशतवादी संघटना या जगाच्या पाठीवर अस्तित्वात आहे.[१]

**दहशतवादाचा अर्थ :**

दहशतवादाने वेढलेल्या आधुनिक जगातील राष्ट्रांना दहशतवाद या समस्येच्या वस्तुनिष्ठ आकलनासाठी दहशतवाद या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करणे झालेला आहे. लॅटिन भाषेतील Terror (Means fear, scare) भिती दाखविणे किंवा दहशत पसरविणे होय. या शब्दाचा प्रसार इतर युरोपीय भाषांमध्ये चौदाव्या शतकात फ्रान्स मधून सुरु झाला. या दोन्ही शब्दाचा अर्थ नंतरच्या काळात बदलत गेला.[२]

दहशत ही गुंतागुंतीची आणि वादग्रस्त संकल्पना आहे. तर दहशत म्हणजे नेमके काय हे व्याख्येवरुनच कळेल. '' काही राजकीय उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी राज्याविरुध्द केलेल्या सुसंघटीत हिंसाचार म्हणजे दहशतवाद होय.''[३] परंतु काही विचारवंतांच्या मते ही व्याख्या समाधानकारक नाही कारण काही हुकूमशहांनी सत्ता मिळविण्यासाठी व ती टिकविण्यासाठी विरोधकांच्या व सामान्य नागरिकांच्या विरोधात दहशतवादाचा वापर केला.

**जॉन केटम यांच्या मते :**

''राजकीय उद्दिष्टये साध्य करण्यासाठी समाजाच्या किंवा त्यातील विशिष्ट स्तरात भिती आणि दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली हिंसात्मक गुन्हेगारी म्हणजे दहशतवाद होय.''४

१ कन्वेंशन ऑन प्रिवेंशन एण्ड पनिशमेंट १९३७ नुसार – ''दहशतवादाचा अर्थ हा त्या अपराधिक कृत्या बद्दल आहे की जे जनसामान्य व सर्वसामान्यांच्या मनात भय व दहशत निर्माण करते.''

२. ''राजकीय उद्देशांना पूर्ण करण्यासाठी उग्रवादी संघटनांनी उचललेले पाऊल होय.''[५]

**ऑपरेशन ब्लु स्टार :**

२३ एप्रिल १९८७ ला पंजाबचे उपमुख्य अधिकारी अरवाल सिंग अरवाल हे प्रार्थनेकरिता सुवर्ण मंदिरमध्ये गेले असता त्यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. याला भिंद्रवाले गटांना जबाबदार ठरले. याच काळात शिख हिंदू मध्ये अनेक दंगली झाल्या १५ नोव्हेंबर १९८३ मध्ये सद्य पंजाबमध्ये तंग वातावरण निर्माण झाले. यासाठी भारत सरकारने ऑपरेशन ब्लु स्टार अभियान राबविले.[६] या कारवाईनंतर भारता मध्ये शिख–हिंदू अनेक मोठया प्रमाणात दंगली, बॉम्बस्फोट घडवून आणले गेले. पंजाबमध्ये अनेक दहशवादी गट निर्माण झाले. उदा. बब्बर खालसा, शमेश रेजिमेंट, दलखालसा या व इतर काही दहशतवादी घटना तिव्र बनत गेल्या.

**भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या :**

१९८७ साली श्रीलंकेतील तामिळ (एल.टी.टी.ई.) प्रश्न सोडविण्यासाठी व शांतता प्रस्थापित करण्याकरिता भारतीय सैन्य श्रीलंकेत (शांती सेना) पाठवले. भारतीय सैन्याने तामिळ बंडखोराचा प्रतिकार मोडून काढला होता. या लष्करी कारवाईत एल.टी.टी.ई.चे बरेच बंडखोर मारल्या गेले होते. त्यानंतर १९९० मध्ये भारतीय सैन्य माघारी बोलावले गेले. या सर्व कारणातून २१ मे १९९१ रोजी गांधी यांची हत्या घडून आली.[७]

**भारतातील दहशतवादी घटना :**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारताला अंतर्गत व



Scanned with CamScanner

बहिर्गत दहशतवादाचा सामना मोठया प्रमाणात करावा लागत आहे. भारत पंजाब, जम्मु कश्मिर, आसाम, नागालॅंड व उत्तर पूर्व राज्यांमध्ये दहशतवादाच्या कारवायांना अनेक वर्षापासून तोंड देत आहे. हा दहशतवाद देशाच्या बाहेरील राष्ट्रांकडून प्रामुख्याने पाकिस्तानकडून संचलित होत आहे. पाकिस्तानशी निगडीत असलेल्या संघटना दहशतवाद्यांना फक्त नैतिक पाठींबाच देत नाही तर त्यांना शस्त्रास्त्रे प्रशिक्षण पैसा व प्रशिक्षित दहशतवादी देखील देतात. त्यांना राजकीय आधार देखिल दिला जातो. त्यांच्याविरुध्द केल्या जाणाऱ्या संरक्षण दलाच्या कारवायांना मानवी अधिकाराच्या उल्लंघनाचे नाव देवून दहशतवादाच्या विरुध्द लढाईला मजबुर केले जाते आणि त्यांची निंदा केली जाते.

**भारतातील काही दहशतवादी कारवाया (घटना)**

१. ३१ ऑक्टोबर, १९८४, नवी दिल्ली— खलिस्तानवादी संघटनेच्या दोन अंगरक्षकाने माजी पंत प्रधान इंदिरा गांधी यांची हत्या केली.

२. २१ मे १९९१, पेरंबुदुर, तामिळनाडू— तमिळ दहशतवाद्यांनी (लिट्टेच्या आत्मघातकी पथकाने) माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या केली.

३. १२ मार्च १९९३, मुंबई — येथे बॉम्बस्फोट होवून २७२ लोक ठार, बाबरी मस्जिद पाडल्यानंतर गुजरात, मुंबई आणि देशात इतत्र मोठया प्रमाणात दंगली घडून आल्या.

४. २५ डिसेंबर १९९९, काठमांडूहून इंडियन एअरलाईन्सच्या विमानाचे अपहरण करून ते कंदहारला नेले.

५. मार्च २००० — बिल क्लिंटन भारत भेटीच्या पार्श्वभूमीवर काश्मीरमध्ये ३५ शिखांचे शिरकाण.

६. १ ऑक्टोबर २००१ — श्रीनगर येथे जम्मू—कश्मीर विधानसभेच्या इमारतीवर आत्मघाती दहशतवादाचा हल्ला स्फोटकाने भरलेल्या टाटा सेमो गाडीत सुरक्षा रक्षकांच्या काडतूयावर आदळून २२ ठार ६० जखमी.

७. डिसेंबर २००१ — नवी दिल्लीतील संसद भवनावर हल्ला. ६ अतिरेकी व ६ सुरक्षा रक्षक ठार.

८. २७ फेब्रुवारी २००२ — गुजरातमधील गोध्रा रेल्वेस्थानकावर झालेल्या हिंसाचारात ५९ रामभक्तांची हत्या.

९. २५ सप्टेंबर २००२ — गुजरातची राजधानी गांधीनगर येथील स्वामी नारायण पंथाच्या अक्षर धाम मंदीरावरील अतिरेक्यांच्या हल्ल्यात २९ भाविक ठार, १०० हून अधिक जखमी.

१०. २६.११.२००८ — मुंबईतील ताज हॉटेलवर हल्ला.

**दहशतवादाच्या निर्मुलनासाठी भारताकडून उपाय**

दहशतवादी, हिंसाचारी कृत्ये होउ नयेत म्हणून प्रत्येक देशातील शासनसंस्था कायद्यांची निर्मिती करते. दहशतवादी अतिरेक्यांना त्यांनी केलेल्या कृत्याबद्दल शिक्षा देण्यासाठी कायद्यांची निर्मिती केली जाते. भारतात दहशतवादी कृत्यांना आळा घालण्यासाठी पुढील कायदे करण्यात आले.

१. प्रतिबंधात्मक स्थानबध्दता कायदा, १९५० (Preventive Detention Act).

२. अंतर्गत सुरक्षाकायदा, १९७१ : मिसा (Maintenance of Internal Security Act.)

३. राष्ट्रीय सुरक्षा कायदा, १९८० : रासुका (National Security Act.)

४. दहशतवाद आणि अशांततावादी कृती विरोधी प्रतिबंधात्मक स्थानबध्दता कायदा, १९८७, टाडा (Terrorist and Disruptive Activities Prevention Act-TADA).

५. दहशतवाद प्रतिबंध अध्यादेश, २००१ पोटो— (Prevention of Terrorism Ordinance-POTO).

६. दहशतवाद प्रतिबंध कायदा,. २००२ पोटा — (Prevention of Terrorism act-POTA).

७. महाराष्ट्रातील संघटित गुन्हेगारी नियंत्रक कायदा, मोका (Maharashtra Organized crime control Act-MOCA.) याच धर्तीवर त्रिपरा, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक राज्यात अनेक कायदे करण्यात आले आहे.

**सारांश :**

भारतीय सार्वभौमत्वाला आणि राष्ट्रीय एकात्मतेला आव्हान देणारा एक महत्वाचा अडसर म्हणून दहशतवादाचा विचार करणे आवश्यक ठरते. भारतातील धार्मिक संघर्ष वाढवून देशाची शकले



Scanned with CamScanner

पाडण्याच्या दहशतवादी अतिरेक्याचे हल्ले वारंवार होत आहेत. यात आत्तापर्यंत पन्नास हजाराहून अधिक लोक बळी पडले आहेत. यात पाकिस्तानातील लष्कर–ए–तोएबा,जैश–ए–मोहम्मद,तहरिक–ए–कसाक अशा अतिरेकी संघटनांनी भारतात कारवाया घडवून आणल्या आहेत. यावरुन पाकचा हात असल्याचे उघड झाले आहे. या रोखण्यासाठी भारताकडून कायदेशीर प्रयत्न केला जात आहे व देशाती अखंडता व एकात्मता जपण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा प्रकारे वाढत्या दहशतवादा विरोधातील भारताची भूमिका स्पष्ट करता येईल.

**संदर्भ :**


१. प्रा.म.न. उदगावकर, एकविसाव्या शतकातील दहशतवाद, पब्लिकेशन, पुणे, पृ. ३.

२. R.C. Mishra Terrorism, Implications of Tacics and Technology Delhi 2004, P.22.

३. फाडिया बी.एल., आंतरराष्ट्रीय राजनीति, साहित्य, भवन, आग्रा, १९९८, पृ.५८८.

४. Ram Mohan Varma, Terrorism and Organsial Crimes, Delhi. 2005, P.11.

५. डॉ.शैलेंद्र देवळाणकर, आंतराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. ४४०

६. Kusher, Encyclopedia of terrorism, California, 2003, p.9.

७. किल्ला, पृ. ४६७, ४६८.

८. लोकमत, आयबीएन.

९. Navshakti.com.2014.

१०. प्रा.म.नं.उदगावकर, एकविसाव्या शतकातील, दहशतवाद, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पृ. ९५.

११. डॉ.शैलेंद्र देवळाणकर,आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ.४३७.

१२. प्रा.म.नं.उदगावकर, एकविसाव्या शतकातील, दहशतवाद, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पृ. ३७.

१३. द. हिंदु, २२ मे १९९९.


**67**

# दहशतवाद : एक जागतिक समस्या


**डॉ. वसंत आर. पवार,**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
जे.ई.एस. महाविद्यालय, जालना.


**************

दहशतवाद आणि भारत यांच्या संदर्भात विचार केल्यास असे स्पष्ट होते की, दहशतवादाचा भारतामध्ये जो विस्तार झाला आहे, तो सार्वत्रिक स्वरुपाचा आहे. २६/११ च्या मुंबईतील हत्याकांड याची जाणिव केवळ भारतीयांनाच नाही तर जागतिक स्तरावर देखिल याची दखल घेतली गेली. दहशतवादाची मुळे भारत आणि पाकिस्तानाबरोबरच दक्षिण एशिया, अफगाणिस्तान, रशिया, तजाकिस्तान, उजबेकिस्तान, चीन, सौदी अरब, मिश्र अलजेरिया तसेच मध्ये पुर्व देश व अमेरिकेतील काही भागात दहशतवादाची तीव्रता अधिक आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादाची सर्वात मोठी तीव्रता म्हणजे ११ सप्टेंबर २००१ चा अमेरिकेवरील हल्ला अधिक जाणवते व भारतातील तीव्रता ही दिवसेंदिवस वाढतांना दिसून येते. मागच्या तीन दशकापासून भारत या समस्येचा सामना करत आहे. आज आंतरराष्ट्रीय समुदायापुढची सर्वात गंभीर समस्या म्हणून दहशतवादाचा उल्लेख केला जात आहे. भारत, रशिया, चीन, अमेरिका, मध्य आशियाई राष्ट्रे, स्पेन इत्यादी राष्ट्रांच्या शांतात आणि सुरक्षिततेला दहशतवादाने आव्हान दिले आहे. एका सर्वेक्षणानुसार गेल्या १५ वर्षात दहशतवादी हिंसाचारातून मारल्या गेलेल्या लोकांची संख्या दोन लाखापेक्षा अधिक आहे. एकट्या जम्मु काश्मीरमध्ये सन १९८९ पासून ९० हजार लोक दहशतवादी हिंसाचारामध्ये मारले गेले आहेत.

**दहशतवाद म्हणजे काय ?**

दहशतवाद म्हणजे काय ? या संदर्भात विशेषतज्ञांचे असे मत आहे की, दहशतवादाची एक परिभाषा करणे, एक कठिण काम आहे. सन १९३६ ते १९८१ या दरम्यान १०९ परीभाषा दहशतवादाच्या संदर्भात केल्या गेल्या. आजही वेगवेगळे विचारवंत या संदर्भात वेगवेगळे मत मांडतात. दहशतवादाच्या संदर्भात एक चिनी तत्ववेत्यांने म्हटले आहे की, Kill one frighten ten thousand म्हणजे



Scanned with CamScanner